## निशाणी क्र. ५ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ नुसार प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी वादींना दावा मिळकतीमधून हुसकावून लावू नये, तसेच दावामिळकती संदर्भात कोणत्याही प्रकारे हस्तांतरणाचे व्यवहार करु नये, दावा मिळकतीवर कर्ज बोजा करु नये अशी अशी तुर्तातुर्त ताकीद मिळण्याकरीता दाखल केला आहे.

**वादीची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणेः**

२. वादीचे असे कथन आहे की, दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या वडिलार्जीत मालकी हक्क कब्जे वहिवाटीच्या असून दावा मिळकतीचे वादी व प्रतिवादी यांचे दरम्याण अदयाप सरस–निरस मानाने वाटप झालेले नाही. सदर वाद मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांची समाईकात प्रत्यक्ष कब्जे वहिवाट आहे. वादी नं.१ व २ या विवाहीत असून त्या सासरी नांदत असतात. प्रतिवादी नं.१, ३, व ४ यांनी दिनांक १६/०६/२००१ रोजी वादी नं.१ व २ यांच्या अपरोक्ष दस्त क्र.२५७२/२००१ ने रजि. वाटपपत्र करुन ठेवले होते. ते वाटपपत्र वादी नं.१ व २ यांना समाविष्ट न करता वादी नं.१ व २ यांचा कायदेशीर हक्क, हिस्सा डावलण्याच्या हेतूने केले होते ते वाटपपत्र वादी नं.१ व २ यांच्या हिश्श्यावर बंधनकारक नाही.

३. वादी पुढे कथन करतात की, प्रतिवादी नं.१ यांनी वादी नं.१ व २ यांच्या वडिलार्जीत मिळकतीतील हक्क व हिस्सा डावलण्याच्या हेतूने दि.२९/०२/२०२० रोजी प्रतिवादी नं.१ याने प्रतिवादी नं.६ याला गट नं.४६३ मधील ०.१ आर क्षेत्र विक्री केले असून त्याची नोंद ७/१२ सदरी फेरफार क्र.१५१९ ने झाली असून ती वादी नं.१ व २ यांच्या हिश्श्यावर बंधनकारक नाही.

पुन्हा प्रतिवादी नं.१ ने प्रतिवादी क्र.८ यास दि.०४/१२/२००१ रोजी गट नं. ४६३ मधील ६२.०० चौ.मी. तसेच प्रतिवादी नं.९ यास गट नं. ४६३ मधील ६२.०० चौ.मी. क्षेत्र वादी नं.१ व २ यांच्या अपरोक्ष विक्री केले असून त्याची नोंद ७/१२ सदरी फेरफार क्र.२२४४ ने झाली असून ती वादी च्या हिश्श्यावर बंधनकारक नाही.

४. वादी पुढे कथन करतात की, प्रतिवादी नं.१ याने प्रतिवादी नं.११ ला दिनांक ०३/१०/२००९ रोजी गट नं.४६३ मधील ०१.३४ आर क्षेत्र वादी नं.१ व २ यांच्या अपरोक्ष विक्री केले असून त्याची नोंद ७/१२ सदरी फेरफार क्र.४६०७ ने झाली असून ती वादी नं.१ व २ यांच्या हिश्यावर बंधनकारक नाही. प्रतिवादी नं.११ यांनी दि ३१.१०.२००९ रोजी खरेदी केलेला गट नं.४६३ मधील १.३४ आर क्षेत्र दिनांक १२/०१/२०११ रोजी प्रतिवादी नं.७ यास विक्री केले असून त्याची नोंद ७/१२ सदरी फेरफार क्र.५४६४ ने झाली असून तो व्यवहार वादीचे अपरोक्ष व संमतीशिवाय झाला असल्याने वादीचे हिश्यावर बंधनकारक नाही. तसेच प्रतिवादी नं.१ यांनी वादी नं.१ व २ यांच्या वडिलार्जीत मिळकतीतील हक्क व हिस्सा डावलण्याच्या हेतूने दि. ०५/०८/२०२० रोजी दस्त क्र.१३४७/२०२० ने प्रतिवादी नं.१० यांना गट नं.४६४/अ/१ मधील ०४.०० आर क्षेत्र वादी नं.१ व २ यांच्या अपरोक्ष विक्री केला असून त्याची नोंद ७/१२ सदरी फेरफार क्र.११९५३ ने झाली. प्रतिवादी नं.१ याने दि.०५/०८/२०२० रोजी दस्त क्र. १३४८/२०२० ने प्रतिवादी नं.४ यास वाद मिळकतीतील गट नं. ४६४/अ/१ मधील ०.०४ आर क्षेत्राचे बक्षिसपत्र करुन दिले आहे, त्याची नोंद ७/१२ सदरी फे.नं.११३९५ ने झालेली आहे. सदर सर्व व्यवहार हे वादींच्या अपरोक्ष झाले असल्याने ते वादींच्या हिश्श्यावर बंधनकारक नाहीत. प्रतिवादी नं.१ हे वडिलार्जीत

शेतजमीन वहिवाटून समाईकात उत्पन्न घेत होते. त्यांना उत्पन्नाचे कोणतेही स्वतंत्र साधन नव्हते. त्यांनी एकत्र कुटूंबाचे शिलकी उत्पन्नातून दावा मिळकत १ब मधील अ.नं.२ ग.नं.३२/१/ब ही मिळकत खरेदी केली असून त्यामध्ये वादी यांचाही समाईक अविभक्त हक्क व हिस्सा आहे.

५. वादी पुढे असे कथन करतात की, दिनांक १०/१२/२०२३ रोजी प्रतिवादी नं.१० यांनी वादी नं.१ व २ यांना समाईकात वहिवाट असणा–या वाद मिळकतीत येवून ''खरेदीपत्राच्या आधारे मी जमिनीत कब्जा घालणार आहे, तुम्हाला काय करायचे ते करा, तुम्हाला तुमचा हिस्सा पाहिजे असेल तर तुम्ही कोर्टाकडून घ्या'' असे म्हणून कब्जा घालणेचा इरादा स्पष्ट केला. तेव्हा वादींना वरील सर्व बेकायदेशीर व्यवहाराची माहिती मिळाली. करीता वाद मिळकतीचे हस्तांतरण होवू नये या करीता तुर्तातूर्त ताकिद अर्ज मंजूर करावा अशी वादींनी विनंती केली आहे.

**<u>प्रतिवादीची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणेः</u>**

६. प्रतिवादी क्र.१, ३, ४ तर्फे तुर्तातूर्त ताकिद अर्जास नि.क्र.४३ वर म्हणणे दाखल करुन वादीच्या अर्जातील संपूर्ण मजकूर व कथने नाकारली व वाद उपस्थीत केला की, कै. भिकोबा बर्गे यांच्या हयातीपर्यत दावा मिळकती त्यांच्या वडिलार्जीत मालकीच्या होत्या व ते मयत झाले त्यावेळी त्यांना मुलगा मुलगी असे कोणीही अपत्य नव्हते त्यांचे पश्चात त्यांची एकमेव वारस पत्नी हिराबाई भिकोबा बर्गे ही पती भिकोबा यांच्या वडिलार्जीत मालकीच्या मिळकती वहिवाटत होती.

७. प्रतिवादी पुढे कथन करतात की, प्रतिवादी नं.६ ते ११ हे वादी , प्रतिवादी नं.१ ते ५ यांचे नातेसंबंधातील नसलेमुळे त्यांचा वडिलार्जीत मिळकतीशी हक्क संबंध नाही तसेच दावा मिळकती हया प्रतिवादी नं.१ याचे स्वतःचे व एकटयाचे

स्वतंत्र मालकी हक्क वहिवाटीच्या असलेमुळे दावा मिळकतीचे वादी नं.१ व २ व प्रतिवादी यांचे दरम्याण सरस–निरस मानाने वाटप किंवा स्वतंत्र कब्जे होण्याचा कोणताही प्रश्न उद्भवत नाही त्यामुळे वादीचा मुळ दावा कायदयाने चालु शकत नसलेमुळे तुर्तातूर्त ताकिद अर्जही कायदयाने चालू शकत नाही.

८. प्रतिवादीच्या कथनानुसार वादी नं.१ व हया वाद मिळकतींची जावून येवून समाईकात वहिवाट करतात, वादी व प्रतिवादी यांचे आजअखेर सामाईकात कब्जे वहिवाट होती हा मजकूर खोटा व काल्पनिक आहे. प्रतिवादी नं.१,३,४ यांनी रजिस्टर वाटपपत्र केलेचा सर्व मजकूर खोटा आहे.प्रतिवादी नं.१ ने दावामिळकती हया त्यांच्या एकटयाच्या स्वतंत्र मालकी हक्क वहिवाटीच्या असलेमुळे दावा मिळकतीबाबत काही कायदेशीर हस्तांतरणाचे व्यवहार केले आहेत.

९. प्रतिवादी पुढे असे कथन करतात की, हिराबाई हिने प्रतिवादी नं.१ यास हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे ता.१५/०६/१९५३ रोजी दत्तक घेवून त्याच दिवशी दत्तकपत्राचा नोंदणीकृत दस्त खटाव(वडूज) येथील नोंदणीकृत कार्यालयात नोंदवण्यात आला व त्या दिवसापासून प्रतिवादी नं.१ विजयकुमार आबाजी जगदाळे हा हिराबाई हिचा मुलगा (अपत्य ) म्हणून त्यास सर्व कायदेशीर हक्क त्या दिवसापासून प्राप्त झाले. अशी वस्तुस्थीती असलेमुळे वादीनी दाव्यात व ताकिद अर्जात केलेली त्यांच्या हक्काबाबतची विधाने ही पोकळ, बनावट, चुकीची खोटी व लबाडीची आहेत. सबब प्रस्तूतचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी प्रतिवादीने विनंती केली आहे.

१०. वादीचा नि.क्र.५ वरील अर्ज व प्रतिवादींचे नि.क्र.४३ वरील म्हणणेचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी क्र.१,३ व ४ यांच्या विद्वान विधीज्ञांचा सविस्तर युक्तिवाद ऐकण्यात आला.

११. वादातीत कथने, सादर करण्यात आलेला युक्तीवाद व उपलब्ध अभिलेखावरुन माझे विचारार्थ खालील वादमुद्दे निष्पन्न झाले. त्यांचे कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवत आहेः

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादीचे वतीने सकृतदर्शनी प्रकरण आहे का ? | होकारार्थी |
| २) | सोयीचा समतोल वादीच्या वतीने आहे का ? | होकारार्थी |
| ३) | प्रस्तूतचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे का? | होकारार्थी. |
| ४) | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## का र ण मि मां सा

१२. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ नुसार, वादीने वादातीत मिळकतीस विरुध्द पक्षकार हानी पोहोचवित आहे, अथवा वादातील मिळकत ही अन्यत्र हस्तांतरीत करत आहे किंवा प्रतिवादी हा वादातील मिळकतीमधील वादीच्या वहिवाटीस क्षती पोहोचवित आहे, वादीचा कब्जा काढून टाकण्याची शक्यता आहे, असे शपथपत्रावरुन व अन्य पुराव्यांवरुन शाबीत केले तर न्यायालयास विरुध्द पक्षकाराच्या कृतीस प्रतिबंध करण्याचा आदेश देता येईल. सबब, तुर्तातुर्त ताकीद अर्जाचा व त्यामधील मागणीचा विचार करताना वादीला प्रथमदर्शनी केस आहे हे वादीने शाबीत करणे गरजेचे आहे.

**मुद्दा क्र. १ ते ३ बाबत.**

१३. मुद्दा क्र. १ ते ३ हे परस्परांशी संबंधीत असल्यामुळे मी एकत्रीतपणे चर्चेसाठी घेत आहे.

१४. वादीने त्यांच्या कथनाच्या समर्थनार्थ अभीलेखावर निशाणी क्र.३ अन्वये कागदपत्रे दाखल केली आहेत. त्यामध्ये मौजे गोळेवाडी व मौजे कोरेगाव येथील वादमिळकतीचे ७/१२ उतारे, फेरफार क्रमांक, वाटप पत्राचा कागद असे कागद नि.क्र.८ ते २१ वर दाखल केले आहेत. वादीने नि.क्र.३६ वरील अर्जानुसार बक्षीसपत्राचे दोन दस्त हजर केले आहेत. सदरील दस्ताचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दस्त क्र.८१०४४/२४ (दि.२९/०२/२०२४), तसेच दस्त क्र. ८१०४५/२४ (दि.२९/०२/२०२४) या बक्षीसपत्रांच्या दस्तान्वये प्रतिवादी क्र.१ विजयकुमार भिकोबा बर्गे याने दिपक विजयकुमार बर्गे व दिनेश विजयकुमार बर्गे यांच्या नावे बक्षीसपत्राने वादमिळकतीचे हस्तांतरण केले आहे. सदरच्या दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दि.०६/०२/२०२४ रोजी वादीने प्रस्तूतचा दावा दाखल केला व तो दि.२०/०२/२०२४ रोजी नोंदवून घेतला आहे. दावा दाखल केलेनंतर प्रतिवादी क्र.१ ने अन्य प्रतिवादी अर्थात प्रतिवादी क्र.१ ची मुले दिनेश बर्गे व दिपक बर्गे यांच्या नावे वाद मिळकतीचे बक्षीसपत्र केल्याचे दिसून येत आहे. वादीने त्याच्या वादपत्रात नमूद केलेली कथने व त्या करीता दाखल केलेल्या प्रथमदर्शणी पुराव्यावरुन असे दिसून येते की, वादीने वाटपाचा व जाहीर ठराव तसेच निरंतर मनाईचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ तसेच प्रतिवादी क्र.३ व ४ यांच्यात दि.२९/०२/२०२४ रोजीची वादमिळकत हस्तांतरणाचे व्यवहारावरुन वाद मिळकतीस धोका असल्याचे दिसून येते. प्रतिवादी यांनी वादमिळकत त्रयस्थ इसमास विक्री केल्याचे ही दिसून येते. वाद मिळकत ही वादी प्रतिवादीची वडिलार्जीत मिळकत असल्याचे अभिलेखावरील कागदपत्रावरुन

प्रथमदर्शणी दिसून येत असल्याने प्रस्तूत वादी या वादमिळकतीच्या सहहिस्सेदार असल्याचे प्रथम दर्शणी दिसून येत आहे.

१५. वादी तर्फे मा. उच्च व सर्वोच्च् न्यायालयाचे खालीलप्रमाणे न्यायनिवाडे दाखल करण्यात आले.

१. **विनिता शर्मा वि राकेश शर्मा अॅण्ड ऑदर (२०२०) ए आय आर (एस सी)३७१७**.

२. **रंगानायकम्मा अॅण्ड ऑदर वि. के. एस. प्रकाश (डी) बाय एल आरएस अॅण्ड ऑदर सिव्हील अपील नं.३६३५ ऑफ २००८ एस सी**.

३. **कालींदी दामोदर गार्डे (डी) बाय एल आर एस वि. मनोहर लक्ष्मण कुलकर्णी (डी) बाय एल आर एस अॅण्ड ऑदर सिव्हील अपील नं.६६४२-६६४३ ऑफ २०१०**.

४. **भीष्मराजा वि. श्रीमती राधाबाई, (रेग्युलर सेकंड अपील नं.७१९८ ऑफ २०१० (एच.सी.कर्नाटका)**.

वरील सर्व न्यायनिवाडयांचे त्यातील तथ्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यालीन न्यायतत्वे ही वादीच्या केसला लागू होतात.

१६. वादी व प्रतिवादीच्या वरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रथम दर्शणी असे दिसून येते की, वादमिळकत ही वादीच्या मालकी व कब्जेवहिवाटीची असल्याबददल वादीने योग्य तो सकृतदर्शणी पुरावा दिलेला आहे. मनाई हुकूमाचा आदेश पारीत करीत असताना हे पाहणे गरजेचे असते की, दावा दाखल करतेवेळी वादी या वादमिळकतीच्या कब्जेदार होत्या. प्रस्तूत प्रकरणामध्ये

वादी व प्रतिवादीचे हिस्से निश्चित होण्याकरीता, तसेच अभिलेखावरील वाटपपत्राच्या परिणामाबाबत निष्कर्षाप्रत येण्याकरीता सबळ पुरावा येणे गरजेचे आहे. सबब हे दोन मुददे पुराव्याअंती शाबीत होणार आहेत. आज रोजी वादींनी प्रथम दर्शणी पुराव्यावरुन त्यांची वडिलार्जीत व एकत्र कुटूंबाच्या मिळकती मध्ये मालकी असल्याचे शाबीत केले आले आहे. वरील सर्व प्राथमिक पुराव्यावरुन वादीने त्यांची केस प्रथमदर्शणी सिध्द केल्यामुळे तसेच 'वादमिळकतीच्या' संरक्षणाकरीता, वादमिळकतीचा नाश होवू नये म्हणून, तिचे बेकायदेशीर हस्तांतरण रोखण्याकरीता मी मुद्दा क्र.१ ते ३ होकारार्थी होकारार्थी निष्कर्ष नोंदवून मुद्दा क्र. ४ च्या निष्कर्षा दाखल मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादींचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी वादी क्र.१ व २ यांना दावा मिळकतीमधून हुसकावून लावू नये, तसेच दावामिळकती संदर्भात कोणत्याही प्रकारे हस्तांतरणाचे व्यवहार करु नये, दावा मिळकतीवर कर्ज, बोजा करु नये अशी अशी तुर्तातुर्त ताकीद वादींच्या हक्कात मंजूर करण्यात येते.

३. खर्चासंबंधी आदेश नाहीत.

( खुल्या न्यायालयात घोषीत )

UMA KAKASAHEB GANGANE
Digitally signed by UMA KAKASAHEB GANGANE
Date: 2024.09.09 13:24:05 +0530

(श्रीमती यु. ए. भोसले)
सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर,
कोरेगाव

दिनांक – ०९.०९.२०२४
ठिकाण –कोरेगाव